Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 487 – 490

DOI: 10.5281/zenodo.10136307

Original Research Article

# महात्मा गांधीजींच्या राजकीय विचारांचा चिकित्सक अभ्यास

श्रीनिवास दत्तात्रय बचाटे

संशोधक विद्यार्थी, नूतन महाविद्यालय, सेलू जि. परभणी, महाराष्ट्र

*Corresponding author E-mail*: shrinivasbachate6811@gmail.com

Received: 14 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

## प्रस्तावना

संपूर्ण मानव जातीसाठी सत्य अहिंसा आणि प्रेम हा संदेश देणारे,वर्तमान परिस्थितीत संपूर्ण जगाला ज्यांच्या विचाराची नितांत गरज आहे अशा थोर महात्म्याचा जन्म 2 ऑक्टोबर 1869 रोजी सध्याच्या गुजरात राज्यातील पोरबंदर (ब्रिटिश भारत) येथे झाला. गांधीजींचे पूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी होते. आईचे नाव पुतलीबाई होते. गुजरातच्या किनारी भागात एका हिंदू कुटुंबात गांधींचा जन्म झाला. गांधीनी इनर टेम्पल, लंडन येथे वकिलीचे शिक्षण घेतले. आता दोन वर्ष राहिल्यानंतर ते 1893 मध्ये दक्षिण आफ्रिकेत एका भारतीय व्यापाऱ्याच्या दाव्यासाठी गेले. ते 21वर्षे दक्षिण आफ्रिकेत कुटुंबासोबत राहिले आणि इथेच असहकार आणि अहिंसेच्या तत्त्वावर आधारित सत्याग्रहाचा उपयोग गांधींनी प्रथमच केला. महात्मा गांधीजींच्या विचारांची सध्याच्या स्थितीमध्ये संपूर्ण जगाला जास्त गरज आहे. गांधीजींच्या विचारानेच या देशाचे कल्याण होईल. त्यांच्या ठायी असलेली करुणा आणि निस्वार्थ भाव हा अतिशय महत्त्वाचा आहे. त्यांचे राहणीमान अत्यंत साधे होते परंतु विचारसरणी मात्र उच्च कोटीची होती. इसवी सन 1915 मध्ये वयाच्या 45 व्या वर्षी ते भारतात परतले आणि लवकरच अन्यायकारक जमीन कर आणि भेदभावाच्या विरोधात शेतकरी कामगार आणि शहरी मजुरांना आंदोलन करण्यासाठी संघटित करण्याचे ठरवले. इसवी सन 1921 मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची सूत्रे सांभाळल्यानंतर गरिबी निर्मूलन, आर्थिक स्वावलंबन, स्त्रियांचे समान हक्क, सर्वधर्मसमभाव, अस्पृश्यता निवारण आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे ‘स्वराज्य’ यासाठी देशभरात चळवळ चालू केली. गांधींनी भारतातील ग्रामीण गरिबांची ओळख म्हणून स्वतः कातलेल्या सुताचे धोतर आणि शाल अशी साधी रहाणी स्वीकारली. त्यांनी शाकाहाराचा अवलंब केला आणि अनेकदा आत्मशुद्धीसाठी आणि राजकीय चळवळींसाठी साधन म्हणून दीर्घ उपवास केले. गांधीजी हे

आजीवन सांप्रदायिकतावादाचे विरोधक होते आणि ते मोठ्या प्रमाणात सर्व धर्म आणि पंथ यांच्यापर्यंत पोहोचले. ढासळत जाणाऱ्या खिलाफत चळवळीला त्यांनी आधार दिला आणि ते मुस्लिमांचे नेते बनले. इसवी सन 1930 मध्ये इंग्रजांनी लादलेल्या मिठावरील कराविरोधात त्यांनी हजारो भारतीयांचे 385 किलोमीटर लांब दांडी यात्रेमध्ये प्रतिनिधित्व केले. त्याचबरोबर इसवी सन 1942 मध्ये त्यांनी इंग्रजांविरुद्ध 'भारत छोडो आंदोलन' चालू केले या आणि यासारख्या इतर कारणांसाठी त्यांना भारतात आणि भारताबाहेर दक्षिण आफ्रिकेत अनेक वेळा तुरुंगवास भोगावा लागला. ऑगस्ट 1947 मध्ये ब्रिटनने स्वातंत्र्य दिले परंतु ब्रिटिश भारतीय साम्राज्य हे दोन अधिराज्यांमध्ये विभागले गेले एक हिंदू-बहुल भारत आणि मुस्लिम-बहुल पाकिस्तान. अनेक विस्थापित हिंदू ,मुस्लिम आणि शीख त्यांच्या नवीन भूमित जात असताना विशेषतः पंजाब आणि बंगालमध्ये धार्मिक हिंसाचार सुरू झाला. स्वातंत्र्याच्या अधिकृत उत्सवापासून दूर राहून गांधींनी पीडित भागाला भेट दिली आणि त्रास कमी करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतरच्या काही महिन्यात त्यांनी धार्मिक हिंसाचार थांबवण्यासाठी अनेक उपोषणे केली. गांधीजींनी काही पुस्तके देखील लिहिलेली आहेत त्यांचे आत्मचरित्र 'माझे सत्याचे प्रयोग' या नावाखाली प्रकाशित झाले. त्यांनी दक्षिण आफ्रिकेतील संघर्षावर 'सत्याग्रहा इन साऊथ आफ्रिका' हे पुस्तक लिहिले आहे. तसेच त्यांनी 'हिंद स्वराज्य किंवा इंडियन होम' ही राजकीय पुस्तिका लिहिली आहे. जॉन रस्किनच्या 'Unto This Last' चे गुजराती भाषांतर केले आहे.

**संशोधनाचा उद्देश**

१. गांधीजींच्या जीवन व कार्याचा आढावा घेणे.

२. गांधीजींच्या राजकीय विचारांचा आढावा घेणे.

**राज्यसत्तेच्या विरोधासाठी 'सत्याग्रह' मार्गाचा अवलंब**

महात्मा गांधीजींनी ब्रिटिश राजवटीच्या काळामध्ये जुलूम आणि अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी एक महत्त्वाचे साधन म्हणून सत्याग्रहाचा वापर केला. सत्याग्रहाचा अर्थ असा की 'सत्याची प्रस्थापना करण्यासाठी व्यक्तीने, समूहाने केलेली अहिंसात्मक कृती होय. गांधीजींनी अहिंसात्मक मार्गाने सत्याग्रहाची कृती केली पाहिजे, या मार्गानेच आपण अंतिम सत्यापर्यंत जाऊन पोहोचतो, असे म्हटले आहे .महात्मा गांधींनी सत्याग्रहींच्या अंगी आत्मसंयमन, ब्रह्मचर्य शाकाहार ,कृत्रिम, बनावट सभ्यतेपासून दोन हात दूर, कर्मयोग आचरणे हे गुण असावेत असे सांगितले. सत्याग्रहाचा वापर हा वैयक्तिक तसेच सामूहिक पातळीवर देखील करता येतो, तो करताना वैयक्तिक लाभासाठी करू नये, तो सामूहिक हितासाठी करावा. त्याबरोबरच सामूहिक शिस्तही पाळली जावी. गांधींनी सत्याग्रही मार्गात आत्मशुद्धी, हरताळ, सविनय कायदेभंग, उपोषण, बहिष्कार इत्यादीचा वापर करावा असे सांगितले आहे.

**सत्य आणि अहिंसा एकाच नाण्याच्या दोन बाजू**

गांधीजी हे सत्य आणि अहिंसाचे महान पुजारी होते त्यांच्या मते सत्य हे अहिंसेशिवाय अपूर्ण आहे. त्यांच्या मते, वाईटाचा विरोध हा हिंसेऐवजी अध्यात्मिक शक्तीने आणि अहिंसेनेच केला पाहिजे. 'माय एक्सपेरिमेंट्स विथ ट्रूथ' या

आत्मचरित्रात लिहिले आहे की, माझ्या सततच्या अनुभवाने मला खात्री पटली आहे की सत्याशिवाय दुसरा कोणताही देव नाही आणि अहिंसा हाच सत्य मिळवण्याचा एकमेव मार्ग आहे.

**धर्माशिवाय राजकारणाचे अस्तित्व नाही**

महात्मा गांधींनी धर्म हा मानवी जीवनाचा केंद्रबिंदू मानला आहे. त्यांना धर्माचे सर्वसमावेशक रूप मान्य होते. गांधीजी हे धार्मिक होते त्यांनी धर्माचा वापर राजकीय हेतूसाठी केला. गांधींचे राजकीय गुरु हे ना.गोपाळ कृष्ण गोखले होते.गांधींना धर्मावर आधारित असलेले राजकारण मान्य नव्हते.हिंदू,जैन,बौद्ध,ख्रिस्ती,इस्लाम यासारख्या सर्व संप्रदायांचा, पंथांचा प्रभाव महात्मा गांधींवर होता. विविध धर्म म्हणजेच एकाच ध्येयाकडे जाणारी विविध मार्ग आहेत, असे त्यांचे मत होते. त्याबरोबरच त्यांनी धर्मातील असलेल्या आणि दोषही त्यांनी मान्य केले. व्यक्ती आणि समाजाच्या कल्याणाचे साधन धर्म आहे तर राजकारणाच्या माध्यमातून व्यक्ती आणि समाजाचे हित जोपासणे ते वाढवणे हे ध्येय आहे.

**महात्मा गांधी आणि रामराज्य संकल्पना**

महात्मा गांधीजींची रामराजे संकल्पना ही वेगळी आहे. गांधींनी संपूर्ण आयुष्यभर आत्मबल आणि आत्मशुद्धीच्या आधारे कार्य केले आहे. गांधींचे रामराज्य म्हणजे आदर्श राज्य होय. ते रामराज्य कोणत्याही एका विशिष्ट धर्माचे,जातीचे नसून ते नीती व मर्यादेवर आधारित राज्य आहे. प्रेम आणि सद्भावना हा या राज्याचा पाया आहे. या राज्यात सर्वांना अभिव्यक्तीचा अधिकार आहे. इसवी सन 1929 मध्ये 'यंग इंडिया'त महात्मा गांधींनी म्हटले आहे की राम राज्याचा अर्थ हिंदू राज्य नाही,माझ्या म्हणण्याचा अर्थ ईश्वरीय राज्य भगवानाचे राज्य माझ्या कल्पनेतील राम या पृथ्वीवर असतील. रामराजाचा प्राचीन आदर्श नि:संदेह एक खरे लोकतंत्र आहे. रामराज्यातील गरिबातील गरीब नागरिकांना न्याय मिळाला पाहिजे. गांधीजींची ही संकल्पना राज्यविहीन, वर्गविहीन आणि जातीविहीन आहे. हे रामराज्य धर्मावर आधारित असले तरी कोणत्याच विशिष्ट रूढ धर्माच्या चौकटीत मर्यादित नाही. या रामराज्यात सर्वच धर्म पंथ हे आनंदाने एकमेकांना विरोध न करता एकत्र नांदू शकतात. त्याबरोबरच या राज्याला भौगोलिक मर्यादा ही नाही. यात सर्व मानव समुदाय हा धर्म, जात, लिंग, भाषा आणि प्रांत या कोणत्याही आधारे भेदभाव करत नाही. मानवता हीच त्याच्या नागरिकत्वाची सर्वात मोठी कसोटी आहे. महात्मा गांधींनी आदर्श राज्य व्यवस्थेला रामराज्य असे म्हटले आहे. त्यांच्या मते, मी अशा प्रकारचा भारत देश निर्माण करण्याचा प्रयत्न करत राहील की गरिबातल्या गरीब व्यक्तींना असे वाटले पाहिजे की हा देश माझा आहे, यात कुठल्याही प्रकारचा उच्च नीच असा भेद केला जाणार नाही महात्मा गांधींनी आपल्या आदर्श राज्याच्या संकल्पनेत मानवता, सर्वधर्मसमभाव, बंधुता, समानता, स्वातंत्र्य इत्यादी आदर्श मूल्यांचा पुरस्कार केला आहे.

**व्यवहारिक आदर्शावर भर**

महात्मा गांधींचे विचार हे आदर्शवर नव्हे तर व्यवहारिक आदर्शावर भर देतात. गांधीवादी तत्त्वज्ञान हे दुधारी शस्त्र आहे. सत्य आणि अहिंसेच्या तत्त्वानुसार व्यक्ती आणि समाजात एकाच वेळी परिवर्तन घडवून आणणे हा त्याचा उद्देश आहे.

**सारांश**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महात्मा गांधींचे योगदान अतिशय महत्त्वपूर्ण आहे. गांधीजींनी सत्य, अहिंसा आणि सत्याग्रहाच्या माध्यमातून वेळोवेळी ब्रिटिश सत्तेच्या जुलमी राजवटीविरुद्ध कार्य केले. महात्मा गांधींनी रामराज्याची संकल्पना मांडली. या रामराज्यामध्ये सर्व धर्मसमभाव, वर्गविहीन, राज्यविहीन, जातिविहीन समाज असावा, त्याबरोबरच व्यक्ती आणि समाजाचे कल्याण करणारा धर्म असावा, असे विचार मांडले आहेत.

**संदर्भ सूची**

१. राजेंद्र होरा,सुहास पळशीकर, राज्यशास्त्र कोष.

२. कृपलानी कृष्ण, म. गांधी जीवन चरित्र, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, अनुवाद उमाकांत ठोंमरे,1984.

३. रघुनाथ माशेलकर, अखंड प्रेरणा गांधी विचारांची, सकाळ प्रकाशन, पुणे, 2011.

४. आर.के.प्रभू, यु.आर.राव,महात्मा गांधींचे विचार, नवजीवन मुद्रणालय.